Dt. --26-04-2025

# बालविकास विद्यालय
# डॉ.अण्णासाहेब चोभे हायस्कूल
## एस .एम.एस.अँड जुनिअर कॉलेज ऑफ
## सायन्स अँड कॉमर्स

## पी टी. ए. मीटिंग

**स्नेहवर्धक मंडळ सोशल अँड एजुकेशनल ट्रस्टच्या विद्यालयाची पालक शिक्षक सभा संस्थेच्या** ऑडिटोरियममध्ये शनिवार दिनांक 26/04/2025 रोजी दुपारी 11.30 वा. आयोजित करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. नूतन कांबळे यांनी उपस्थित शिक्षक पालक व संस्थेचे पदाधिकारी असे सर्वांचे स्वागत केले व सभेला प्रारंभ केला. शैक्षणिक वर्ष 2025-26 हि पालक सभा नर्सरी ते दहावी वर्गाच्या पालक -शिक्षकांमध्ये घेण्यात आली यामध्ये प्रामुख्याने खालील विषयांवर चर्चा करण्यात आली .......

१ .विद्यर्थ्याची अभ्यासाची प्रगती

२. पुढील शैक्षणिक वर्षातील नियोजन

३. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये फी वाढवली आहे . सदर फी ही तीन वर्षांनी वाढवली आहे. अँपद्वारे ऑलीने पद्धतीने स्वीकारण्यात येईल.

४. २०२५-२६ या वर्षाकरिता पूर्व- प्राथमिक ते जुनिअर कॉलेज पर्यंत शाळेच्या युनिफॉर्ममधे बदल केलेला नाही.

५. शाळेच्या सहली ह्या जवळच्या ठिकाणीच व एक दिवसासाठी नेल्या जातील, तसेच शासन नियमाप्रमाणे व सर्व सुरक्षितता बाळगून नेल्या जातील.

६. सामुर्ण शाळा सकाळी ९.०० ते ४.०० या वेळेत भरवली जाईल. तसेच शाळेत ७५% उपस्थिती अनिवार्य असेल तसेच दोन वेळेचा डब्बा आणणे अनिवार्य राहील.

७. मेडिकल व डेंटल चेकअप केले जातील व करिअर गाईडन्ससाठी विशेषज्ञ बोलावले जातील .

८. मुलामुलींच्या सुरक्षिततेसाठी सखी सावित्री मंच व दामिनी पथकाची स्थापना, पूर्व प्राथमिक ते १० वि च्या विद्यार्थ्यांसाठी प्रहरी पथकाची (Anti Addiction ) स्थापना,तसेच तक्रार पेटीची सोयकेलेली आहे याविषयी सांगण्यात आले.

९. सर्व मुलामुलींना वाहन चालविणे तसेच वाहन चालवताना घायवयाची काळजी यासंबंधी सूचना व मार्गदर्शन दामिनीपथकाने दिले

१०. तसेच गुड टच अँड बॅड टच चे पी.पी.टी. द्वारे मार्गदर्शन करण्यात आल्याचे सांगितले .

११. परीक्षा संपल्यानंतर रिसूल्टच्या दिवशी (ओपन डे ) सर्व पालकांना बोलावून त्यांच्या पाल्याच्या अभ्यासातील प्रगतीविषयी, शाळेच्या वर्तणुकीविषयी सांगितले जाते.

ह्यानंतर सर्व स्टाफ व पालकांची ओळख करून देण्यात आली व उपस्थित पालकांमधून उपाध्यक्ष व जॉईंट सेक्रेटरी यांची निवड पालकांनी केली. नव्याने निवड झालेल्या सदस्यांचा अध्यक्ष व प्रिंसिपल यांनी सत्कार केला व त्यांना मनोगत व्यक्त करण्यास सांगितले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर अध्यक्ष श्री चंद्रकांत शेटे यांनी पालक प्रतिनिधी म्हणून व्यक्त केल्या. तसेच सचिव श्री. किशोर राजस यांनी पालक प्रतिनिधी मुळे शालेय कामकाज सुरळीत होण्यास मदत होते. यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. असे मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत शेटे, सचिव श्री. किशोर राजस, खजिनदार श्री. शिवाजी आगळे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. नूतन कांबळे, कार्यालयीन अधीक्षक सौ.सुजाता कुलकर्णी सर्व विभाग पर्यवेक्षक श्री.सागर केंजूर, सौ.वंदना भोळे व सौ. अमृता देशमुख शिक्षक वृंद उपस्थित होते...
चहापानाने सभेची सांगता झाली.